## न्यायनिर्णय

(दिनांक ०३ जुन,२०२६ रोजी घोषीत)

सदर प्रकरणातील अभियोगपक्षाचे कथन व पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता माझे विचारार्थ उपस्थित झाले व ते मुद्दे करण्यात आलेल्या चर्चेवरुन आलेल्या निष्कर्शासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक २२.१०.२०२२ रोजी २०.०० ते २०.३० वाजताचे दरम्यान मौजा– वाढोणा, ता. आर्वी, जि. वर्धा येथे आरोपीच्या ताब्यातुन १४ लिटर मोहाफुल गावठी दारु विनापरवाना व अवैध्यरित्या बाळगतांन मिळुन आला, व त्याव्दारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| २) | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

### – कारणमिमांसा –

**मुद्दा क्र.१ बाबत:–**

२) आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने फक्त पंच देवराव काशीराम ढोले (अ.सा.१) याला तपासले. नि.क्र.१ वरील आदेशानूसार अभियोगपक्षाच्या पुराव्याची बाजू बंद करण्यात आली. आरोपीविरुध्द त्याला गुन्हयात गुंतविणारा पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये बयाण नोंदविण्यात आले नाही.

३) देवराव (अ.सा.१) या पंच साक्षीदाराने त्याच्या साक्षीत सांगितले की, पोलीसांनी त्याला पंचनामा करण्याकरीता पंच म्हणुन कुठेही बोलवले नव्हते व त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नव्हता तसेच तो आरोपी व दुसरा पंच

नामे मानिक सोमकुवर यांना ओळखत नाही. त्याने आपल्या साक्षीद्वारे त्याच्या पूर्व कथनारुप साक्ष न दिल्याने सरकारी वकीलांनी त्याला उत्तरसूचक प्रश्न विचारले, परंतु त्यामध्ये प्रकरणाच्या दृष्टीने काहीही महत्वपूर्ण आले नाही, त्यामुळे सदरील साक्षदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

४) उपरोक्त पुराव्यावरुन घटनास्थळावर नेमके काय घडले, याबाबत पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. अभियोगपक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत केलेला नाही, त्यामुळे सदरील प्रकरणातील मोहाफुल गावठी दारु ही आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आले होते, हे शाबीत होत नाही. जरी रासायनिक परिक्षणाचा अहवाल पोलीसांनी अभिलेखावर दाखल केलेला असला तरीसुध्दा त्यासंदर्भात ज्याने सॅम्पल नमुना पाठविला त्याला साक्षीदार म्हणून अभियोगपक्षाने तपासले नाही तसेच सदर प्रकरणामध्ये सॅम्पल करीता वापरण्यात आलेल्या रिकाम्या बाटलीचा पंचनामा केला नाही. त्यामुळे सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल असला तरीसुध्दा देवराव (सा.क्र.१) याने असे सांगितले की, त्याचे समोर जप्त मुद्देमालातून १८० मि.ली. मोहाफुल दारु सी.ए. परिक्षणाकरिता पोलीसांनी वेगळी काढली नव्हती, त्यामुळे अभियोगापक्षाने सबळ पुरावा देऊन सदर बाब सिध्द केलेली नाही. सदर प्रकरणात अभियोग पक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आले नाही. सबब, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला, ही बाबच पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही. त्यामुळे, आरोपीच्या विरोधात असलेले आरोप संशया पलिकडे सिध्द झाले नाही. सबब, पुराव्या अभावी आरोपीचा गुन्हा सिध्द होत नसल्याने मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत:-</u>**

५) अभियोगपक्षाने आरोपीचा गुन्हा शाबीत करण्यासाठी सबळ, विश्वसनीय व संयुक्तीक पुरावा सदरच्या खटल्यामध्ये आणलेला नाही, त्यामुळे आरोपीच्या विरोधात असलेले आरोप संशयापलीकडे सिध्द झाले नाही, त्यामुळे आरोपी हा निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येते व आरोपीच्या जमानतदारास मुक्त करण्यात येते.

३) जप्त मुद्देमाल १४ लिटर मोहाफुल गावठी दारु व प्लॅस्टीक डबकी हे पोलीसांनी जागीच नाश केले आहेत.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी नव्याने रुपये ५०,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र दाखल करुन अपिलात हजर राहण्याची हमी द्यावी.

DESHMUKH NARESH JANRAO
Digitally signed by DESHMUKH NARESH JANRAO
Date: 2026.06.03 18:15:15 +0530

दिनांक- ०३.०६.२०२६

(एन.जे.देशमुख)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, आर्वी.

## Certificate

I affirm that the contents of this PDF Judgment are same word to word, as per the original Judgment.

V. S. Kharat,
Stenographer (Grade-3)